### स्वयंपूर्ण आणि समृद्ध गावं निर्माण करण्यासाठी...

# साद ग्राम : एक गाव, बारा उपक्रम

१) **पायाभूत सुविधा : वीज, रस्ते, पाणी :** ग्रामीण भागात निर्मिती होणाऱ्या उत्पादनांचा योग्य विक्रीविनियोग होण्यासाठी गावातील दळणवळणांची साधने अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. अखंडित वीज आणि पाणी या प्रमुख सुविधा गावात योग्य प्रकारे चालू असल्यास गावाच्या विकासाला चालना मिळते. रस्तेबांधणी प्रकल्प, अखंडित वीजपुरवठा, 'पाणी अडवा-पाणी जिरवा'सारखे प्रकल्प सरकारच्या माध्यमातून गावखेड्यांत राबविण्यासाठी मार्गदर्शन, प्रयत्न करणे. (३००)

२) **शिक्षण :** ग्रामीण भागात शिक्षणाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्याने शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर होत आहे. यामुळे शहरे बकाल व खेडी ओस पडत चालली आहेत. हे रोखायचे असेल तर ग्रामीण भागातील शाळांना उत्तम शैक्षणिक सुविधा पुरवणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे. संस्थेच्या माध्यमातून 'जगा आणि जागा - समृद्धीतून सहयोग' या उपक्रमांतर्गत समाजाच्या सहयोगाने या सुविधा उपलब्ध करून देणे. (१००)

३) **आरोग्य :** शरीर निरोगी तर कुटुंब, गाव निरोगी. ग्रामीण भागातील बालक ते ज्येष्ठांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, महिलांसाठी विशेष तपासण्या आणि तरुणांसाठी, प्रौढांसाठी रक्तदान, आरोग्य विमा शिबिरसारखे उपक्रम विविध वैद्यकीय तज्ज्ञांच्या माध्यमातून राबविणे. (१००)

४) **शेती, पर्यावरण आणि शेतीपूरक व्यवसाय :** शेती, फलोत्पादन, फुलोत्पादन यांसारख्या शेती प्रकारांबरोबरच शेतीपूरक व्यवसायांना सक्षम करण्याच्या दृष्टीने ग्रामस्थांसाठी शेती तज्ज्ञांचा शेतकऱ्यांशी संवाद साधून पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन व मत्स्य व्यवसायसारखे विविध उपक्रम, त्यांच्या उत्पादन व विपणनासाठी कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शन करणे. (१२०)

५) **रोजगार, कौशल्य प्रशिक्षण व ग्रामीण तंत्रज्ञान :** होतकरू, उत्साही आणि गरजू तरुणांना नोकरी किंवा उद्योगक्षेत्रात आवश्यक ती कौशल्य आत्मसात करण्याची नितांत गरज आहे. पंतप्रधान कौशल्य विकास योजनेअंतर्गत विविध क्षेत्रांतील कौशल्य प्रशिक्षण व करिअरबाबत संवाद साधणे तसेच शेतीपूरक व्यवसायात येणाऱ्या लघुउद्योगांबाबत युवकांना प्रोत्साहित करणे. (८०)

६) **सहकार व शेती कंपन्या :** गावातील समृद्धीसाठी सहकाराची मोठी साथ लाभत असते. सहकारी तत्त्वावर विविध कार्यकारी संस्था तसेच हल्लीच्या शेती कंपन्यांच्या माध्यमातून गावखेड्यांतील समृद्धीला चालना मिळवून देणे. (५०)

७) **ग्रामस्वच्छता व पर्यावरण :** स्वच्छ सुंदर, हरित ग्राम निर्मितीसाठी स्वच्छता अभियान मोहीम, पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येईल. यात हागणदारीमुक्त खेडे, संडास बांधणी प्रकल्प, वृक्षारोपण, सांडपाणी प्रकल्पसारख्या उपक्रमाच्या माध्यमातून 'स्वच्छ ग्राम, स्वच्छ भारत' ही संकल्पना बळकट करणे. (८०)

८) **महिला सक्षमीकरण व बालकल्याण :** ग्रामीण भागातील महिलांना स्वायत्तता, सुरक्षा आणि संरक्षण देण्यासाठी महिला सक्षमीकरणासारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. बचत गट, प्रशिक्षण, स्त्री प्रश्न जनजागृती, कुटुंब संगोपन, शारीरिक-मानसिक आरोग्य यांसारख्या उपक्रमातून महिला सक्षमीकरणावर भर देणे. (८०)

९) **ज्येष्ठ नागरिक, कौटुंबिक आणि सामाजिक समस्या निराकरण :** समाज म्हटलं की, सामाजिक, कौटुंबिक ताणतणावही आलेच. व्यसनमुक्ती, जात पंचायत, हुंडाबंदी, अंधश्रद्धा, दारू व गुटखा निर्मूलनासारखे उपक्रम हाती घेऊन कौटुंबिक कलह, सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणे. (१२०)

१०) **जनजागरण : प्रशिक्षण/संवाद/शिबिर/प्रबोधन :** महिला, युवक-युवती, विद्यार्थी, पालक, शेतकरी, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक या सर्वांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, शेती, कायदेविषयक, अर्थविषयक, शासकीय योजना, सुविधा, उद्योग आणि रोजगार यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण, शिबिरे, संवाद आणि प्रबोधनरूपी कार्यक्रम आयोजित करणे. (८०)

११) **संस्कृती संवर्धन : कला/क्रीडा/साहित्य/संस्कृती/मनोरंजन/पर्यटन :** प्रत्येक गावाची एक संस्कृती असते. या संस्कृतीत अनेक वैविध्यपूर्ण कलांचा उगम गावभागातच होत असतो. त्याच प्रमाणे या कला काही वेळेस ग्रामविकासाच्या किंवा मनोरंजनाच्या दृष्टीने अनेक प्रथांशीही जोडलेल्या असतात. ग्रामीण अर्थविकासाला, लोककलेला बळकटी देणाऱ्या विविध कलांना आणि मनोरंजनाच्या निमित्ताने ग्रामस्थांना संघटित करणाऱ्या गावातील मनोरंजनात्मक उपक्रमांना, क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन देणे. तसेच बालक, महिला, तरुण आणि समस्त ग्रामस्थांना साहित्याची गोडी लागावी आणि त्यांच्यावर वाचनसंस्कार व्हावेत, यासाठी साहित्याशी निगडित उपक्रम, ग्रंथालय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही मार्गदर्शन करणे. (६०)

१२) **नैसर्गिक आपत्ती निवारण :** भूकंप, दुष्काळ, वणवा, पूर, वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्ती अचानक जेव्हा ग्रामस्थांवर ओढवल्या जातात तेव्हा त्यांना मानसिक उभारी देण्याची नितांत आवश्यकता असते. अशा नैसर्गिक आपत्तीग्रस्त ग्रामस्थांचे मनोधैर्य उंचावून, साह्य देऊन त्यांचे पुनर्वसन करणे.(३०)